www. sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १४४ • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरुवार दि.२७ मार्च २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# परिवहनमंत्री प्रताप सरनाईक म्हणतात एसटी बसमधील सामाजिक संदेश आता मराठीतच

## गुढीपाडव्यापासून अंमलबजावणी सुरू



**नागपूर (वृत्तसंस्था)**–परिवहन विभागाकडे नोंदणी झालेल्या प्रत्येक व्यवसायिक वाहनावरील सामाजिक संदेश मराठी भाषेत प्रदर्शित करावे, असे निर्देश राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी अधिकाऱ्यांना दिले. याच्या अंमलबजावणीच्या तरखेबाबतही त्यांनी महत्वाचे भाष्य केले.येत्या गुढीपाडव्यापासून मराठी नववर्ष सुरू होत आहे या मुहूर्तावर राज्यामध्ये परिवहन विभागामार्फत नोंदणी झालेल्या प्रत्येक व्यवसायिक वाहनावर लिहिले गेलेले सामाजिक संदेश हे मराठीत असले पाहिजेत, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी परिवहन विभागाला दिले आहेत. महाराष्ट्र राज्याची मराठी ही अधिकृत राज्य भाषा आहे. महाराष्ट्रातील नागरिक हे प्रामुख्याने मराठी भाषिक आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नातून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. सहाजिकच मराठी भाषेचे संवर्धन करणे ही शासनाची नैतिक जबाबदारी आहे. तथापि, राज्यात नोंदणी असलेल्या अनेक व्यावसायिक वाहनांवर सामाजिक संदेश, जाहिरात आणि प्रबोधनात्मक माहिती हिंदीत किंवा इतर भाषांमध्ये लिहीली असते. (उदा . 'बेटी बचाव बेटी पढाव') त्यामुळे मराठी भाषेच्या प्रचार व प्रसारवर बंधने येतात.

या पुढे असे सामाजिक संदेश, जाहिरात व प्रबोधनात्मक माहिती मराठी भाषेत प्रदर्शित केल्यास ( उदा . मुलगी वाचवा..मुलगी शिकवा..!) महाराष्ट्रातील जनतेला अधिक उपयुक्त माहिती मिळेल आणि मराठी भाषेचा प्रचार व प्रसार होईल. तसेच मराठी भाषेचा योग्य सन्मान राखला जाईल. त्यासाठी येत्या गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर महाराष्ट्र राज्यात नोंदणीकृत असलेल्या सर्व व्यावसायिक वाहनांवरील सामाजिक संदेश तसेच इतर महत्वाच्या जाहीराती व प्रबोधनात्मक माहिती मराठी भाषेत लिहीण्याची अंमलबजावणी सुरु करावी. तसे निर्देश परिवहन आयुक्त यांना दिल्याचे मंत्री सरनाईक यांनी प्रसिद्धीपत्रकातून सांगितले. त्यामुळे याची अंमलबजावणी काशी होणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

# भोयर, पवार सह १५ जातींचा ओबीसी यादीत समावेश करा

## खा.अमर काळे यांची लोकसभेत मागणी

**नागपूर (प्रतिनिधी)–महाराष्ट्रातील भोयर, पवार सह १५ जातींचा समावेश तातडीने केंद्रीय ओबीसी यादीत करण्यात यावा, अशी ठोस मागणी वर्ध्याचे नवनिर्वाचित खा.अमर काळे यांनी लोकसभेत शून्य तासात मांडली.गेल्या ११ वर्षांपासून अखिल भारतीय भोयर पवार महासंघ व सहकारी संघटना या मागणीसाठी केंद्र सरकार व राष्ट्रीय ओबीसी आयोगाकडे पाठपुरावा करत आहेत. महाराष्ट्र ओबीसी आयोग व राज्य शासनाने दिलेल्या शिफारसीनंतर, हंसराज अहिर यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय ओबीसी आयोगाने ८ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्र सरकारकडे या जातींचा समावेश करण्यासाठी प्रस्ताव पाठविला. मात्र, ६ महिने उलटूनही हा प्रस्ताव केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयात कॅबिनेट मंजुरीसाठी प्रलंबित आहे.**



अखिल भारतीय भोयर पवार महासंघाच्या प्रतिनिधींनी खासदार अमर काळे यांच्याकडे हा प्रश्न तातडीने सोडवण्याची विनंती केली. त्यांनी तुरंत केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्री वीरेंद्र कुमार खटिक यांची भेट घेऊन निवेदन दिले आणि या विषयावर सविस्तर चर्चा केली.खासदार अमर काळे यांनी लोकसभेत शून्य तासाच्या हरकतीच्या मुद्द्यात केंद्र सरकारकडे महाराष्ट्रातील १५ जातींचा समावेश तातडीने करण्याची मागणी केली.यावेळी त्यांनी स्पष्ट केले की, ही प्रक्रिया लांबणीवर पडल्याने हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व शासकीय नोकरीतील आरक्षण प्रलंबित राहून त्यांचे नुकसान होत आहे.राष्ट्रीय ओबीसी आयोगाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी त्वरित करावी, यासाठी सरकारने कॅबिनेट मीटिंग घेऊन निर्णय घ्यावा, अशी मागणी अमर काळे यांनी केली.त्यांच्या ठोस भूमिकेबद्दल अखिल भारतीय भोयर पवार महासंघ व सहकारी संघटनांनी अमर काळे यांचे आभार मानले आणि महाराष्ट्रातील ओबीसी समाजाला न्याय मिळेपर्यंत पाठपुरावा सुरू ठेवावा, अशी विनंती महासंघाचे सचिव मोरेश्वर भादे यांनी केली.

# सरकार शेतकऱ्यांबद्दल उदासीन का?

## खासदार प्रतिभा धानोरकर यांचा केंद्र सरकारला सवाल



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**–अर्थसंकल्प अधिवेशनादरम्यान पुरवणी मागण्यांवरील चर्चेत खासदार प्रतिभा धानोरकर यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर केंद्र सरकारला धारेवर धरले. सिंचन व्यवस्था, शेतकरी आत्महत्या, ग्रामीण भागातील रस्त्यांची दयनीय अवस्था यासह विविध मुद्द्यांवर त्यांनी सरकारला प्रश्न विचारत तात्काळ निर्णय घेण्याची मागणी केली.


चंद्रपूर-यवतमाळ जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांची संख्या सर्वाधिक असल्याचे विधान त्यांनी सभागृहात केले. शेतमालाला हमीभाव, सिंचनासाठी पाणी आणि सरकारने आश्वासित केलेली कर्जमाफी तातडीने पूर्ण करावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली. खासदार धानोरकर यांनी मागील दहा वर्षांत केंद्र सरकार सर्वच क्षेत्रांत अपयशी ठरल्याची भावना व्यक्त केली. शेतकरी आणि शेतमजूर यांच्या बाबतीत सरकार उदासीन असल्याचा आरोप करत त्यांनी नदी जोड प्रकल्प हाती घेऊन बारमाही पाण्याची सोय करण्याची मागणी केली. ग्रामीण भागातील रस्त्यांसाठी ग्रामविकास विभागाने तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, तसेच विविध प्रकल्पांसाठी घेतल्या जाणाऱ्या जमिनींच्या मोबदल्यामध्ये वाढ करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### 'हर घर नल' योजना अपयशी

**हर घर नल योजनेबाबत सरकार पूर्णपणे अपयशी ठरल्याचे सांगून ही योजना अद्यापही कार्यान्वित झालेली नाही, अशी टीका खासदार धानोरकर यांनी सभागृहात केली. देशाच्या विकासा साठी केंद्र सरकारने शेतकऱ्यांसाठी तातडीने ठोस निर्णय घ्यावेत आणि कृतज्ञता व्यक्त करावी, अशी मागणीही त्यांनी लोकसभेत केली.**

# आमदार व क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांची वाशिम जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती

**भिगवण । प्रतिनिधी**



राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे मंत्री हसन मुश्रीफ यांनी काही दिवसांपूर्वी वाशिम जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांच्या जागी कोणाची नियुक्ती होणार याबाबत चर्चा सुरू होती. अखेर, इंदापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार व राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांची वाशिम जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती करण्यात आल्याचे अधिकृत परिपत्रक जाहीर करण्यात आले आहे. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक जिपामं-१३२४/ प्र.क्र.४७/र.वका.-२, दि. १८.०१.२०२५ या आदेशात अंशतः बदल करून मंत्री दत्तात्रय भरणे यांची पालकमंत्री म्हणून निवड करण्यात आली आहे. आजपासून दत्तात्रय विठोबा भरणे हे अधिकृतरित्या वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून कार्यभार स्वीकारतील.

# रोहित पवारांनी माझ्यावर हल्ला घडवून आणला:गोपीचंद पडळकर यांचा आरोप

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आपल्यावर हल्ला घडवून आणल्याचा गंभीर आरोप भाजप आमदार तथा धनगर नेते गोपीचंद पडळकर यांनी केला आहे. त्यांनी यासंबंधी पुरावा म्हणून एका व्यक्तीलाही हजर केले. त्याच्या छातीवर शरद पवारांचा फोटो गोंदलेला होता. पडळकर यांच्या या आरोपामुळे राजकारण चांगलेच पेटले आहे.

गोपीचंद पडळकर बुधवारी विधान भवन परिसरात पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, आमदार रोहित पवार यांनी २०२१ मध्ये माझ्यावर हल्ला घडवून आणला. वर्षभरापूर्वी एक व्यक्ती माझ्याकडे आला. त्याने मला सांगितले की, रोहित पवार व सुप्रिया सुळे तुमच्याविरोधात षडयंत्र रचत आहेत. मला धनगरांचा



विरोध आहे हे दाखवण्यासाठी धनगर तरुणांना फोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची फेरचौकशी करावी. तसेच संबंधितांना सहआरोपी करावे.विरोधक माझ्या जवळच्या तरुणांना माझ्यावर हल्ला करण्यासाठी फितवण्याचा प्रयत्न करत आहेत. विशेषतः रोहित पवार हे पडळकरांना मारहाण करा, त्यांचे व्हिडिओ सादर करा, त्यांच्याविरोधात पोस्ट करा, धनगर समाजाच्या कार्यक्रमात गोंधळ घाला असे सांगत आहेत. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल रोहित पवारांविषयीचा माहिती पुढे आणली. ते आपल्या आजोबाचा विषय पुढे चालवत आहेत. जयकुमार गोरे प्रकरणात त्यांच्यावर गुन्हे दाखल करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करा. याशिवाय सोलापुरात माझ्या गाडीवर जो हल्ला झाला होता, त्या प्रकरणी या व्यक्तीचे स्टेटमेंट घेत रोहित पवारांवर गुन्हा दाखल करावा, असे ते म्हणाले.

# आश्रमशाळेतील प्रश्नांवर आदिवासी मंत्र्यांशी सकारात्मक चर्चा

## आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने मंत्री,सचिव,आयुक्तांसोबत सहविचार सभा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्यासोबत लोहगड बंगला, मुंबई येथे २५ मार्च २०२५ रोजी राज्यातील आदिवासी विकास विभागाअंतर्गत शासकीय / अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या निवारणार्थ सहविचार सभा पार पडली.यावेळी शासकीय / अनुदानित आश्रम शाळेतील मुलांच्या भोजनाची वेळ बदलून ती सकाळी १० वाजता करण्यात यावी, याबाबत चर्चा करण्यात आली. याबाबत लवकरच सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन मंत्री महोदय यांनी दिले.

अनुदानित आश्रमशाळेतील विशेष खास बाब म्हणून मान्यता देण्यात आलेल्या १४३३ कर्मचाऱ्यांचे थकबाकी वेतन अदा करण्यात यावी, याबाबत आमदार सुधाकर अडबाले यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावर बैठकीत चर्चा करण्यात आली. याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे निर्देश मंत्री डॉ. अशोक उईके यांनी सचिव महोदयांना दिले.

१९८२/८४ ची जुनी पेन्शन योजना जशीची तशी लागू करण्यात यावी. यासंदर्भात मा अपर आयुक्त, नागपूर यांचे दि.१०/१०/२०२४ चे आदेश पूर्ववत कायम ठेवण्यात यावे, अशी मागणी केली. याबाबत वित्त विभागाच्या सल्ल्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल अशी माहिती मा. सचिव महोदय यांनी दिली.तसेच शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक व कर्मचारी यांचे वेतन एक तारखेला करण्यात यावे, आदिवासी नक्षलग्रस्त भागात कार्यरत कर्मचाऱ्यांना जो वेतन आयोग लागू असेल त्यानुसार बेसिकच्या १५% मर्यादित किमान २०० व कमाल १५०० यानुसार प्रोत्साहन भत्ता लागू करणे, शाळा व वसतिगृह विभाग वेगळा करण्यात यावा, नवीन आकृतीबंध रद्द करून विलोपित झालेली पदे पुनर्जीवित करण्यात यावीत. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात वर्ग चार कर्मचाऱ्यांच्या पदांना मंजुरी देण्यात यावी, शिक्षकांची अशैक्षणिक कामे कमी करणे, अनुदानित आश्रम शाळेतील कर्मचाऱ्यांना NPS मध्ये समाविष्ट करून PRAN CARD देण्यात यावे, रोजंदारी (वर्ग ३ व वर्ग ४) व कंत्राटी (कला, क्रीडा, संगणक) तत्वावरील कर्मचाऱ्यांना कायम करावे तसेच रिक्त पदावर तातडीने भरती करावी, शासकीय व अनुदानित आश्रम शाळेत



नर्स पदाची भरती प्राधान्याने करण्यात यावी, शिक्षकांना १०-२०-३० ही तीन लाभांची आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात यावी, शिक्षण कक्षातील पदोन्नती कोट्यातील पदे तातडीने भरण्यात यावी व शिक्षण कक्ष पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात यावा, मुख्याध्यापकांना राजपत्रित अधिकाऱ्याचा दर्जा देण्यात यावा, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांकरिता पदोन्नतीचे सेवा प्रवेश नियम तयार करून त्यांना पदोन्नतीची संधी देण्यात यावी, ग्रंथपालांना सुधारित वेतनश्रेणी व पदोन्नतीची संधी उपलब्ध करून देण्यात यावी, अनुदानित आश्रमशाळेकरीता असलेला काम नाही वेतन नाही हा शासन निर्णय रद्द करण्यात यावा, चारही विभागातील बदल्या ह्या दिनांक ९ एप्रिल २०१८ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार समुपदेशनानेच व पारदर्शक पद्धतीने केल्या जाव्यात, प्रतिनियुक्तीच्या धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी तसेच शिक्षक संवर्गास कोणत्याही परिस्थितीत प्रतिनियुक्ती देण्यात येऊ नये, शासकीय व अनुदानित आश्रम शाळेतील माध्यमिक शिक्षकांना एक स्तर अंतर्गत ४८०० ग्रेडवेतन व प्राथमिक शिक्षकांना ४३०० ग्रेडवेतन लागू करण्यात यावे, दहावी व बारावीचा निकाल ५०% किंवा ८०% च्या आत असल्यास शिक्षक व मुख्याध्यापक यांची वेतनवाढ थांबवण्यात येऊ नये, सर्व आश्रम शाळांमध्ये लिपिक संवर्गाचे पद मंजूर करून त्यांची भरती करण्यात यावी. मंजूर असलेल्या पदावर नियमित भरती होईपर्यंत मानधन तत्वावर लिपिक संवर्गीय पद भरण्यास मंजुरी देण्यात यावी व इतर समस्यांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. आश्रमशाळेतील शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न प्राधान्याने सोडविले जातील, असे आश्वासन आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोकजी उईके, मा. सचिव, आयुक्त यांनी यावेळी दिले. सदर सभा दीड तास चालली. बैठकीला आदिवासी विकास विभागाचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक, सचिव विजय वाघमारे, आयुक्त लिना बनसोडे, अपर आयुक्त अमरावती जितेंद्र चौधरी, उपसचिव श्री. जाधव, कक्ष अधिकारी श्री. बंडगर, अपर आयुक्त नागपूर उपायुक्त श्री. दिगंबर चव्हाण, अन्य अधिकारी, सिटू संघटनेचे राज्याध्यक्ष डॉ. डी एल कराड, राज्य सरचिटणीस प्रा. बी टी भामरे, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष जयदीप सोनखासकर, शशांक मोहोड, सिटू संघटनेचे नागपूर विभागीय अध्यक्ष आर. टी. खवशी, संस्कृती संघटनेचे भोजराज फुंडे, अमोल वाबळे, शरद बिरादार, माधुरी पवार व समस्याग्रस्त शिक्षक उपस्थित होते.

# मुख्याध्यापकांविरोधात शिक्षक भारतीची तक्रार
# प्रशिक्षणासाठी शिक्षकांना कार्यमुक्त न करण्याचा आरोप

**सोलापूर । प्रतिनिधी**
राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत राज्यभरातील शिक्षकांसाठी 'शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण २.०' अनिवार्य करण्यात आले आहे. मात्र, नूतन विद्यालय हायस्कूल, कुर्डूवाडी (ता. माढा, जि. सोलापूर) येथील मुख्याध्यापकांनी शाळेतील ३५ पैकी एकाही शिक्षकाला प्रशिक्षणासाठी पाठवले नाही, असा गंभीर आरोप शिक्षक भारती सोलापूर संघटनेने केला आहे.शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, हे प्रशिक्षण ऊखएढ सोलापूरच्या मार्गदर्शनाखाली सहा टप्प्यांत राबवण्यात आले. तरीही, मुख्याध्यापकांनी जाणूनबुजून शिक्षकांना प्रशिक्षणाला पाठवले नाही. विशेष म्हणजे प्रशिक्षणाच्या कालावधीत सर्व शिक्षकांच्या स्वाक्षऱ्या शाळेच्या हजेरीपटावर आहेत, म्हणजेच त्यांना जबरदस्तीने शाळेत थांबवण्यात आले आहे.

**खएढ सोलापूरकडे वारंवार तक्रारी असूनही कारवाई नाही!**
संघटनेचे प्रवक्ते विजयकुमार गुंड यांनी ऊखएढ सोलापूरकडे तक्रार दिली असतानाही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे शिक्षक भारतीने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT), पुणे यांच्याकडे मुख्याध्यापकांवर प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी केली आहे. शिक्षकांना प्रशिक्षणापासून वंचित ठेवणे त्यांच्या व्यावसायिक विकासास अडथळा आणण्यासोबतच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीला हरताळ फासण्यासारखे असल्याचे शिक्षक भारतीने म्हटले आहे. कारवाई न झाल्यास संघटना तीव्र आंदोलन करेल, असा इशारा देण्यात आला आहे. संघटनेच्या या आंदोलनात रियाज अहमद अत्तार, सूर्यकांत कणमुसे, राजकुमार देवकाते, शशिकांत पाटील, देवदत्त मेटकरी, नितीन रुपनर, शरद पवार, अभिनंदन उपाध्ये, अमोल तावस्कर, मायाप्पा हाके, मल्लिकार्जुन पाटील, योगेश टोणपे, गिरीधर सुरवसे, शिवराज विभुते आदी पदाधिकारी उपस्थित होते.



**शिक्षक प्रशिक्षण अनिवार्य असून, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यशस्वी करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षित करणे अत्यंत आवश्यक आहे. तरीही मुख्याध्यापकांनी शिक्षकांना कार्यमुक्त न केल्याने त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी.**
**– विजयकुमार गुंड**
**जिल्हा प्रवक्ता, शिक्षक भारती सोलापूर**

## पोटेगाव बंधारा दुरुस्ती तातडीने सुरू करा–शेतकऱ्यांची मागणी





**सोलापूर । प्रतिनिधी**
करमाळा तालुक्यातील सर्वात मोठा कोल्हापूर पद्धतीचा पोटेगाव बंधारा दुरुस्तीअभावी कोरडा पडला आहे, त्यामुळे शेतकऱ्यांचे भविष्य धोक्यात आले आहे. माजी आमदार संजय मामा शिंदे व जयवंतराव जगताप यांनी या दुरुस्तीसाठी चार कोटी सोळा लाख रुपये निधी मंजूर केला असला, तरी काम अद्याप सुरू झालेले नाही.
करमाळा उपअभियंता संजय अवताडे यांनी टेंडर प्रक्रिया पूर्ण केली होती, मात्र ते सेवानिवृत्त झाल्यानंतर वर्क ऑर्डर न मिळाल्याने काम थांबले आहे. सद्यस्थितीत बंधारा पूर्ण कोरडा असून काम सुरू करण्यास कोणतीही अडचण नाही, तरीही विलंब होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे.पोटेगाव, बालेवाडी, तरटगाव, निलज, पोथरे, बिटरगाव, बोरगाव या गावांचे भवितव्य या बंधाऱ्यावर अवलंबून आहे. ठेकेदार कोण आहे याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले असले, तरी कोरड्या बंधाऱ्याकडे पाहून त्यांचे डोळे पाणावले आहेत.माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी तातडीने लक्ष घालून हे काम सुरू करावे, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. तालुक्यातील अधिकारी याबाबत खरी माहिती फक्त जगताप यांनाच सांगू शकतात, त्यामुळे त्यांनी या कामात त्वरित हस्तक्षेप करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## पारनेर तालुक्यातील रस्त्यांसाठी साडेतीन कोटींचा निधी मंजूर

**पारनेर । प्रतिनिधी**
तालुक्यातील विविध रस्त्यांच्या कामांसाठी साडेतीन कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. खा. नीलेश लंके यांनी ही माहिती दिली. जिल्हा नियोजन मंडळाच्या माध्यमातून हा निधी मंजूर झाला असून, लवकरच कामांना सुरुवात होणार आहे. खा. नीलेश लंके यांनी सांगितले की, लोकसभेत काम करण्याची संधी मिळाल्यानंतर विकासकामांचा सिलसिला सुरूच आहे. नागरिकांच्या मागणीनुसार रस्त्यांसाठी हा निधी मंजूर करण्यात आला असून, कामे लवकरच सुरू केली जातील. ग्रामस्थांनी खा. नीलेश लंके यांचे आभार मानले आहेत



**या रस्त्यांसाठी निधी मंजूर**
**पिंपरीपठार ते पाडळीदर्या – ७५ लाख**
**भोंद्रे ते कान्हूरपठार – ७५ लाख**
**लोणीमावळा ते दरोडी – ५० लाख**
**सांगवी सुर्या ते वडूले – ७५ लाख**
**हंगा ते मुंगशी ते सुलतानपूर–७५ लाख**

## कल्पना गोटणे यांचे निधन

**मोहोळ । प्रतिनिधी**
नरखेड येथील शहाजीराव पाटील विद्यालय व महाविद्यालयातील सहशिक्षिका कल्पना अशोक गोटणे (परांडे) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्या ५६ वर्षांच्या होत्या.
त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सासू, दिर, जाऊ, एक भाऊ आणि दोन बहिणी असा परिवार आहे. सेवानिवृत्त भारतीय सैनिक शाहू गोटणे यांच्या त्या भावजय होत्या.




## सोशल मीडियाचा गैरवापर केल्यास कारवाई–पोलिस अधीक्षकांचा इशारा

**धुळे । प्रतिनिधी**
सोशल मीडियावर जाती-धर्माच्या भावना दुखावणारे पोस्ट, फोटो किंवा व्हिडीओ शेअर केल्यास कडक कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिला आहे. धुळे पोलिसांच्या सोशल मीडिया सेलद्वारे सतत नजर ठेवली जात असून, अफवा पसरवणाऱ्या आणि समाजविघातक पोस्ट करणाऱ्यांवर महाराष्ट्र पोलिस कायदा आणि भारतीय दंड संहितेनुसार गुन्हे दाखल केले जातील.आक्षेपार्ह पोस्ट तयार करणाऱ्या, ग्रुप ॲडमिन किंवा फॉरवर्ड करणाऱ्यांविरोधातही कारवाई होणार आहे. नागरिकांनी अशा पोस्ट फॉरवर्ड करू नयेत आणि पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन पोलिस अधीक्षकांनी केले आहे.



## मोहोळ तालुक्यात अवकाळी पावसाचा तडाखा; शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

**मोहोळ । प्रतिनिधी**
तालुक्यातील नरखेड, मलिकपेठ, भोयरे, हिंगणी (नि), डिकसळ, मसले चौधरी या भागांत सोमवारी सायंकाळी पावणे पाचच्या सुमारास वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि अवकाळी पावसाने हजेरी लावली.
या पावसामुळे रब्बी हंगामातील गहू, हरभरा, ज्वारीसह अनेक पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. मळणीसाठी शेतात ठेवलेले धान्य भिजल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला. तसेच द्राक्ष बागांमध्ये पाणी जाऊन मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.गेल्या काही दिवसांपासून उन्हाची तीव्रता वाढली होती, अधूनमधून ढगाळ वातावरण दिसत होते, त्यामुळे शेतकरी चिंतेत होते. काढणी अंतिम टप्प्यात असताना अचानक आलेल्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात हानी झाली.काही शेतकऱ्यांनी ज्वारी काढून फोडणीसाठी शेतात ठेवली होती, ती पावसाने भिजली, तर कांदा उत्पादकांनी मार्केटसाठी भरलेल्या पिशव्या भिजल्याने मोठे नुकसान झाले. द्राक्ष बागांनाही हा पाऊस महागात पडणार आहे.शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करून सरकारने तत्काळ मदत जाहीर करावी, अशी मागणी केली जात आहे.



## करमाळ्यात युवासेनेतर्फे मोफत सीईटी सराव परीक्षा

**सोलापूर । प्रतिनिधी**
अकरावी, बारावी आणि पदवी शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी युवासेना – शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) तर्फे २९ मार्च रोजी मोफत सीईटी सराव परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती युवासेना तालुकाप्रमुख शंभूराजे फरतडे यांनी दिली. ही परीक्षा आमदार आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आणि आमदार वरूण सरदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली सलग सहा वर्षे राज्यभर आयोजित केली जात आहे. मात्र, करमाळा तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी प्रथमच ही संधी उपलब्ध झाली आहे.ही परीक्षा यशस्वी करण्यासाठी मयूर यादव, सागर तळेकर, समीर परदेशी, कल्पेश राक्षे, कुमार माने, आदित्य जाधव, वैष्णवी साखरे, प्रसाद निंबाळकर, अभिषेक माने, ओंकार कोठारे, मयूर तावरे, विशाल नवगन, अमिर कबीर आदी पदाधिकारी प्रयत्नशील आहेत.



**ऑफलाइन पद्धतीने परीक्षा**
**ही अभियांत्रिकी, वैद्यकीय, विधी आणि फार्मसी शाखांसाठीच्या कॉमन एन्ट्रन्स टेस्ट (उएढ) साठी उपयुक्त ठरणार आहे. ही परीक्षा २९ मार्च २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत ग्लोबल सायन्स इन्स्टिट्यूट, करमाळा येथे होणार आहे.**
**नोंदणी प्रक्रिया**
**विद्यार्थ्यांनी www. yuvasenacet. com या संकेतस्थळावर किंवा स्कॅनर कोडद्वारे ऑनलाइन नोंदणी करणे बंधनकारक आहे.**
**अधिक माहितीसाठी संपर्क**
**शंभूराजे फरतडे (८६०००६४५४५)**
**प्रा. महेश निकत (९८६०८७८२३४)**

## श्रीमती कुसुम आप्पासाहेब मोरगे यांचे निधन

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**
मोरगे वस्ती येथील श्रीमती कुसुम आप्पासाहेब मोरगे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले – सुरेश मोरगे, बाळासाहेब मोरगे, रमेश मोरगे, दीर बाबासाहेब मुरलीधर मोरगे, तसेच नातू, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.
सुमारे दीड महिन्यापूर्वी त्यांचे पती आप्पासाहेब मुरलीधर मोरगे यांचेही हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले होते.



## शिरूर पोलिसांची मोठी कारवाई: अपघातानंतर फरार झालेला वाहनचालक अटक


**शिरूर । प्रतिनिधी**
शिरूर पोलिसांनी अपघात करून फरार झालेल्या अज्ञात वाहनचालकाला अटक केली आहे. ११ मार्च २०२५ रोजी शिरूर तालुक्यातील शिरसगाव काटा येथे झालेल्या अपघातात करणसिंग ग्यारसिंग जमरे (वय ४९, रा. बडवाणी, मध्य प्रदेश) यांचा मृत्यू झाला होता, तर टिकम जमरे गंभीर जखमी झाले होते.
पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करण्यात आला. त्यातून अपघात करणारा वाहन अशोक लेलंड कंपनीचा टेम्पो (एमएच २५ एजे ७६३७) असल्याचे निष्पन्न झाले.



सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रमेश कदम यांच्या पथकाने वारे वडगाव (जि. धाराशिव) येथे जाऊन टेम्पो आणि चालक प्रितेश राजेंद्र गायकवाड याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान गायकवाड याने अपघाताची कबुली दिली.ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले आणि पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रमेश कदम करत आहेत.

## शिरूरमध्ये १८ वर्षीय तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

**शिरूर । प्रतिनिधी**
शिरूर शहरातील रामलिंगरोड परिसरात १८ वर्षीय तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. अंजली गजानन टिपरे (वय १८) असे मृत तरुणीचे नाव असून, २४ मार्च रोजी सकाळी हा प्रकार उघडकीस आला.
मिळालेल्या माहितीनुसार, अंजली आपल्या कुटुंबासोबत शिरूर येथे राहत होती. तिचे काका राजू रामदास टिपरे आणि कुटुंबातील सदस्य विटभट्टीवर कामासाठी गेले होते. सकाळी ९:४५ वाजता अंजली घरी परतली. काही वेळानंतर तिची ९ वर्षांची चुलत बहीण उषा रडत विटभट्टीवर आली आणि तिने घराचा दरवाजा उघडत नसल्याची माहिती दिली.



ही माहिती मिळताच राजू टिपरे आणि त्यांच्या पत्नीने तातडीने घरी धाव घेतली. त्यांनी दरवाजा ठोठावला, पण कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने दरवाजा तोडला. यावेळी अंजलीने लाकडी वाशाला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेतल्याचे दिसले.कुटुंबीयांनी तिला तातडीने शिरूर ग्रामीण रुग्णालयात नेले, मात्र डॉक्टरांनी तपासून तिला मृत घोषित केले.घटनेची माहिती मिळताच शिरूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार शिंदे आणि तपास अधिकारी हवालदार राऊत यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.अंजलीने आत्महत्या का केली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## गोळवाडी येथे श्री अष्टविनायक गणेश व महादेव मंदिर वर्धापन दिन महोत्सव

**वैजापूर । प्रतिनिधी**
वैजापूर तालुक्यातील गोळवाडी (मांजरे वस्ती) येथे श्री अष्टविनायक गणेश व महादेव मंदिराचा वर्धापन दिन महोत्सव बुधवार, २६ मार्च २०२५ रोजी सुरू होणार आहे. भगवान परमात्म्याच्या कृपेने व श्री संत जगद्गुरु जनार्दन स्वामी यांच्या आशीर्वादाने हा सोहळा महंत १०८ शिवगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणार आहे.
महोत्सवाच्या पहिल्या दिवशी २६ मार्च रोजी पहाटे ४ ते ६ या वेळेत काकड आरती, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, तसेच रात्री भजन व भारुडाचा हरीगजर होणार आहे.२७ मार्च (गुरुवार) रोजी सकाळी १० ते १२ ह.भ.प. श्री गौरव महाराज खरे (रा. खेडा, ता. कन्नड) यांच्या काल्याच्या कीर्तनाने धार्मिक वातावरण निर्माण होणार आहे.
कीर्तनानंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे.या धार्मिक महोत्सवाला सर्व गोळवाडी व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने



उपस्थित राहून कीर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन तुकाराम मांजरे, बाबूलाल मांजरे, नारायण मांजरे, सुनील मांजरे (ग्रामपंचायत सदस्य, गोळवाडी), एकनाथ मांजरे, स्वराज मांजरे व मांजरे परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## नादरपूर येथे भव्य पशुप्रदर्शन संपन्न



**पिशोर । प्रतिनिधी**
कन्नड तालुक्यातील नादरपूर येथे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती पशुसंवर्धन विभागाच्या वतीने तालुकास्तरीय भव्य पशुप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.या प्रदर्शनात ५५० हून अधिक पशुपालकांनी सहभाग घेतला, तर ३०० जनावरे स्पर्धेत सहभागी झाली. १३ गटांमध्ये स्पर्धा घेण्यात आली, विजेत्यांना रोख बक्षिसे आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.
प्रथम पारितोषिक १५००, द्वितीय १०००, तृतीय ५००, तर सर्व सहभागी जनावरांना १०० उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले.या कार्यक्रमाला जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. विजय फुन्से, सरपंच सविता निकम, सहा. आयुक्त डॉ. मिलिंद देशमुख, डॉ. विष्णु खोडवे, डॉ. तैय्यब अत्तार, डॉ. विनोद चव्हाण, डॉ. प्रदीप मोराळे आदी उपस्थित होते.सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर बिडाईत यांनी, तर आभार दिलीपराव निकम यांनी मानले.

## नालासोपाऱ्यात शिवसेनेतर्फे शिवजयंती उत्सव साजरा

**मुंबई । प्रतिनिधी**
नालासोपाऱ्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) संख्येश्वर नगर, वॉर्ड क्रमांक ७२ यांच्या वतीने १७ मार्च रोजी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.
कार्यक्रमाला शिवसेना विभागप्रमुख विनोद पार्टे, शाखाप्रमुख अभिजित कदम यांच्यासह पदाधिकारी, महिला आघाडी आणि युवासेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.
सांस्कृतिक स्पर्धांमध्ये ग्रुप डान्स, एकेरी डान्स आणि भजन यांचा समावेश होता. ग्रुप डान्स स्पर्धेत प्रथम क्रमांक शिवशक्ती कॉम्प्लेक्स (बी विंग), द्वितीय क्रमांक शिवशक्ती कॉम्प्लेक्स (एक विंग) आणि तृतीय क्रमांक विधी पार्लर यांनी पटकावला.एकेरी डान्स स्पर्धेत अनुष्का सावंत प्रथम, हिरंण्या आंबेकर (शीर गाव, गुहागर) द्वितीय, तर सायली कदम तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली.शिवजयंती जल्लोषात साजरी झाली असून विजेत्यांचे अभिनंदन करण्यात आले.



# उमरखेड विधानसभा कार्यकर्ता संवाद बैठक संपन्न

## निष्ठावान कार्यकर्त्यांनाच भाजपात संधी-नितीन भुतडा

**उमरखेड । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक निवडणुकीच्या अनुषंगाने सदस्य नोंदणी अभियानाचा आढावा घेण्यासाठी उमरखेड येथे कार्यकर्ता संवाद बैठक पार पडली. भाजपा यवतमाळ-पुसद जिल्ह्याचे समन्वयक आणि पश्चिम विदर्भ संघटनपर्व प्रमुख नितीन भुतडा यांनी यावेळी सांगितले की, भाजपात निष्ठावान कार्यकर्त्यांनाच संधी दिली जाते.

उमरखेड-महागाव विधानसभा सदैव संघटनात्मकदृष्ट्या अग्रेसर राहिली आहे. सभासद नोंदणीमध्ये ही विधानसभा यवतमाळ जिल्ह्यात प्रथम क्रमांकावर असल्याचे भुतडा यांनी सांगितले.राजस्थानी भवन, उमरखेड येथे आयोजित बैठकीस प्रमुख मान्यवर म्हणून आमदार किसनराव वानखेडे, माजी आमदार उत्तमराव इंगळे, माजी आमदार नामदेवराव ससाणे, माजी आमदार प्रकाश पाटील देवसरकर, माजी आमदार विजयराव खडसे, तालुकाध्यक्ष सुदर्शन पाटील रावते, डॉ. इरफान कुंदन, माजी नगराध्यक्ष बालाजी उदावंत, जीपचे माजी अध्यक्ष रमेश चव्हाण, साहेबराव पाटील कदम, बळवंतराव नाईक, मनीषा काळेश्वरकर, दत्ता गंगासागर, जगदीश नरवाडे, उत्तम राठोड, बाळू भट्टड, सविता पाचकोरे, आशाताई देवसरकर, नागोराव ढोले, सुदाम खंदारे यांच्यासह भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आमदार किसनराव वानखेडे यांनी संघटनात्मक बळकटीसाठी भाजप कार्यकर्त्यांची



भूमिका महत्त्वाची असल्याचे नमूद केले. माजी आमदार विजयराव खडसे यांनी भाजप हा शिस्तबद्ध पक्ष असल्यानेच आपण त्यात सामील झाल्याचे सांगितले. तसेच, कोणत्याही पदाची अपेक्षा न करता आयुष्यभर कार्यकर्ता म्हणून कार्यरत राहण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.माजी आमदार प्रकाश पाटील यांनी संघटनात्मक कार्यपद्धतीवर भाष्य करत पक्षासाठी तन-मन-धनाने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. बैठकीत उमरखेड आणि महागाव तालुक्यातील शहर व ग्रामीण मंडळांचा संघटनात्मक आढावा घेण्यात आला. यावेळी भाजपा बुथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख, पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, नगरपंचायत व नगरपालिका सदस्य, सर्व प्रकोष्ठ, आघाडी प्रमुख, ज्येष्ठ कार्यकर्ते, तसेच आजी-माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहराध्यक्ष प्रकाश दुधेवार यांनी केले, तर प्रास्ताविक पुसद जिल्हा महामंत्री महेश काळेश्वरकर यांनी केले. आभार प्रदर्शन आमदार वानखेडे यांनी मानले.

# जागतिक क्षयरोग दिनानिमित्त भाषण स्पर्धेचे आयोजन





**वर्धा । प्रतिनिधी**

नेहरू युवा केंद्र, वर्धा आणि अस्तित्व बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक क्षयरोग दिन (२४ मार्च) निमित्त अजिंठा विद्यालय, सिंधी (मेघे), वर्धा येथे भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून शालेय विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा उद्देश ठेवण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक मा.प्रदीप पाटील,वर्गशिक्षिका पंकजा गादेवार,मुदित बाल विद्यालयाच्या कल्पना सातव,मनीष पुसाटे, तसेच अस्तित्व बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रोशन नवघरे, सदस्य पल्लवी वानखेडे व प्रतीक्षा कोल्हे उपस्थित होते.स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.अनामत पाटील हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर कु.वैष्णवी कांबळे हिला द्वितीय आणि कु.स्वराज वानखेडे याला तृतीय क्रमांक मिळाला. विजेत्यांना प्रमाणपत्र व ट्रॉफी प्रदान करण्यात आली.कार्यक्रमात वर्गशिक्षिका पंकजा गादेवार यांनी विद्यार्थ्यांना क्षयरोगाची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन पल्लवी वानखेडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रतीक्षा कोल्हे यांनी केले.

# स्वातंत्र्य मिळवण्यात मुस्लिम समाजाचे मोठे योगदान

## ईफ्तार पार्टीत माजी खासदार रामदास तडस यांचे मनोगत

**देवळी । प्रतिनिधी**

देशाच्या विकासासाठी सर्वधर्मीय समाजबांधवांची एकजूट असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात मुस्लिम समाजाने मोठे बलिदान दिले असून, सर्वाधिक शहीद मुस्लिम बांधव झाले. देवळीतील मुस्लिम समाजदेखील स्वातंत्र्य चळवळीत अग्रेसर होता, याची नोंद इतिहासात आहे. देवळीमध्ये सामाजिक ऐक्य आणि बंधुभाव टिकवण्याची समृद्ध परंपरा असून, येथे मुस्लिम समाज मोठ्या संख्येने नसतानाही त्यांना नगराध्यक्षपदी विराजमान करण्यास माझी महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे, असे मत माजी खासदार रामदास तडस यांनी व्यक्त केले.

येथे आयोजित ईफ्तार पार्टीच्या समारोप समारंभात ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, मी नगराध्यक्ष झालो, तेव्हापासून ईफ्तार पार्टीचे




आयोजन सुरू केले. आज या परंपरेला ४० वर्षे पूर्ण होत असून, ही सामाजिक ऐक्याची परंपरा कायम ठेवावी. सर्वधर्मीयांनी मिळून आदर्श जीवनशैली अंगीकारावी.या प्रसंगी जामा मस्जिदचे इमाम फैजान रजा यांनी आपल्या भाषणात माणुसकीचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, मनुष्याच्या आयुष्यात माणुसकी असणे गरजेचे आहे. जर माणुसकी नसेल, तर तो खरा मनुष्य नाही. आमच्या मोहम्मद पैगंबरांनी आदर्श जीवनशैली अंगीकारण्याचे आणि सर्वांनी एकत्र आनंदाने जीवन जगण्याचे शिक्षण दिले आहे.कार्यक्रमास मोहम्मदिया मस्जिदचे हाफिज खान, माजी नगराध्यक्ष शोभा तडस, हबीब खा पठाण, मोहम्मद साजिद खान, माजी नगराध्यक्ष अब्दुल जब्बार तव्वर, अयुब अली पटेल, शेख जुम्मेद ठेकेदार, अब्दुल हमीद शेख, शेख अजीज, शेख सत्तार आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उमेश कामडी, नरेंद्र मदनकर, रवी करोटकर, गणेश शेंडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# कराडचे तत्कालीन मुख्याधिकारी शंकर खंदारे व सहाय्यक नगर रचनाकार लाच प्रकरणी अटकेत

**सातारा । प्रतिनिधी**

कराड येथे बांधकाम परवानगीसाठी दहा लाख रुपयांची लाच मागणाऱ्या आणि पाच लाख रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या सहाय्यक नगररचनाकारासह दोघांना सातारा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले.

या प्रकरणी कराड नगरपरिषदेचे तत्कालीन मुख्याधिकारी शंकर खंदारे, सहाय्यक नगररचनाकार स्वानंद दिलीप शिरगुपे (रा. कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर), बांधकाम विभागातील कनिष्ठ लिपिक तौफिक कययुम शेख (वय ४०, रा. कारवे नाका, कराड) आणि खाजगी व्यक्ती अनिल देव यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कराडमधील एका बांधकाम व्यावसायिकाने पाच मजली इमारतीच्या परवानगीसाठी २०१७ मध्ये अर्ज केला होता. सुधारित नियमावलीनुसार २०२३ मध्ये परवानगीसाठी पुन्हा अर्ज सादर करण्यात आला. सहाय्यक नगररचनाकार स्वानंद शिरगुपे व खाजगी व्यक्ती अनिल देव यांनी तक्रारदारास २,००० चौरस फूट वाढीव एफएसआय असल्याचे सांगून त्यासाठी ८० लाख रुपयांपैकी १० ते १२ टक्के म्हणजेच १० लाख रुपयांची मागणी पंचांसमक्ष केली होती. नुकतीच बदली झालेले तत्कालीन मुख्याधिकारी शंकर खंदारे, सहाय्यक नगररचनाकार स्वानंद शिरगुपे आणि खाजगी व्यक्ती अनिल देव तसेच पालिका कर्मचारी तौफिक कययुम शेख यांनी तक्रारदाराकडून लाचेचा पहिला हप्ता म्हणून पाच लाख रुपये स्वीकारताना रंगेहात पकडले. सातारा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस उपअधीक्षक राजेश वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक सचिन राऊत, श्रीधर भोसले, हवालदार नितीन गोगावले, गणेश ताटे, प्रशांत नलावडे आणि विक्रमसिंह कणसे यांनी सापळा रचून कारवाई केली. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सहाय्यक नगररचनाकार स्वानंद शिरगुपे आणि तौफिक शेख यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

# श्रीराम नवमी उत्सव व कैकाडी महाराज जयंतीनिमित्त संगीतमय श्री शिव महापुराण कथा


**कोल्हार । प्रतिनिधी**

श्रीराम जन्मोत्सव समिती व सकल हिंदू समाजाच्या वतीने श्रीक्षेत्र कोल्हार येथे श्रीराम नवमी उत्सव आणि राष्ट्रीय संत कैकाडी महाराज जयंतीनिमित्त संगीतमय श्री शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे.



ही कथा सोमवार, ३१ मार्च २०२५ ते रविवार, ६ एप्रिल २०२५ या कालावधीत श्री भगवती माता मंदिरासमोरील प्रांगणात संपन्न होणार आहे. ह. भ. प. श्री नवनाथ महाराज म्हस्के (सद्गुरू नारायणगिरीजी महाराज गुरुकुल, बाभळेश्वर) यांच्या सुश्राव्य आवाजात ही कथा भाविकांना ऐकण्याचा लाभ मिळणार आहे.६ एप्रिल रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत काल्याचे कीर्तन होणार असून त्यानंतर महाप्रसाद वाटप होणार आहे.भाविक भक्तांनी या संगीतमय श्री शिव महापुराण कथेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम जन्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# वरोरा नगर परिषदेच्या वतीने २८७ दिव्यांग लाभार्थ्यांना अर्थसहाय्य वाटप



**वरोरा । प्रतिनिधी**

सन २०२४-२५ मध्ये वरोरा नगर परिषदेच्या हद्दीतील एकूण पात्र २८७ दिव्यांग लाभार्थ्यांना मार्च २०२५ पूर्वी प्रत्येकी ५००० रुपये प्रमाणे अर्थसहाय्य थेट त्यांच्या खात्यात आरटीजीएस प्रणालीद्वारे वितरित करण्यात आले. हे सहाय्य ५ टक्के अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार देण्यात आले आहे.यावेळी नगर परिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी विशाखा शेळकी, कार्यालय अधिक्षक जगदीश गायकवाड, लेखापाल राजेश बांगर, तसेच दिव्यांगांना विविध योजनांची माहिती देऊन सहकार्य करणारे कर्मचारी घनश्याम तिवारी (वरिष्ठ लिपिक, न. प. वरोरा) यांचा पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

आज दिनांक २६ मार्च २०२५ रोजी नगर परिषद मुख्याधिकारी कार्यालयात आयोजित स्वागत समारंभात दिव्यांग लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. या प्रसंगी प्रशांत विठल भोयर (मालविय वार्ड), सुभाष पेंडे, सोमेश्वर बडवाईक, शारदा रुयारकर, माया करलुके, गणेश राऊत, अयुबखाँ पठाण, विशाल करलुके, प्रतिभा करलुके, भास्कर पेंदोर, मंगेश खिरटकर, प्रमोद जरिले, अरुण कायरकर, बबलू शेख, विठल धाबेकर आदी दिव्यांग बांधव उपस्थित होते.शासनाच्या ध्येयधारणेनुसार ३१ मार्च २०२५ पूर्वी अर्थसहाय्य वितरित केल्याबद्दल दिव्यांग बांधवांनी नगर परिषद प्रशासनाचे आभार मानले.

# संतोषसिंह रावत मित्र परिवाराने जुनासुर्ला गाववासीयांची तहान भागवली

**मूल । प्रतिनिधी**

उन्हाळ्याच्या तीव्रतेने नदी-नाले, विहिरी आणि कूपनलिका कोरड्या पडू लागल्या असून, मुल तालुक्यातील मौजा जुनासुर्ला गावात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर, काँग्रेस नेते, सी.डी.सी.सी. बँकेचे अध्यक्ष व माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संतोषसिंह रावत यांनी स्वनिधीतून दोन बोरवेल उपलब्ध करून देत गावकऱ्यांची पाण्याची गरज भागवली.

जुनासुर्ला काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी गावातील पाण्याच्या तुटवड्याची बाब लक्षात घेऊन संतोषसिंह रावत यांच्याकडे बोरवेल खोदण्याची मागणी केली होती. गावकऱ्यांची ही मागणी तातडीने स्वीकारत संतोषसिंह रावत मित्र परिवाराने वॉर्ड क्रमांक १ मध्ये दोन बोरवेल खोदून दिल्या. त्यामुळे उन्हाळ्यात निर्माण होणाऱ्या पाण्याच्या संकटावर मात करत



नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आणि काँग्रेस जिल्हा महासचिव राकेश रत्नावार, माजी सभापती आणि काँग्रेस जिल्हा महासचिव घनशाम येनूरकर, जुनासुर्ला ग्रामपंचायत सरपंच रंजित समर्थ, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामीण काँग्रेस नेते राजू पाटील मारकवार, कृषी बाजार समितीचे माजी संचालक विनायकराव बुग्गावार, सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष गणेश खोब्रागडे, सदस्य विठ्ठलभाऊ इंगोले, रामूजी कोरीवार, बिराजी ककलवार, मूरलीधर लोडेलीवार तसेच गावातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संतोषसिंह रावत मित्र परिवाराच्या या सामाजिक योगदानाबद्दल जुनासुर्ला काँग्रेस पदाधिकाऱ्यांसह संपूर्ण गावकऱ्यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहेत.

# जि.प.उच्च प्राथमिक शाळा कापसीची विद्यार्थिनी आस्था सातपुते नवोदय विद्यालयासाठी पात्र

**मूल । प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी घेण्यात आलेल्या जवाहर नवोदय विद्यालय प्रवेशपूर्व परीक्षेत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कापसी (ता. सावली, जि. चंद्रपूर) येथील विद्यार्थीनी कु. आस्था प्रदीप सातपुते हिची निवड झाली आहे.

वर्ग ५ वीच्या वर्गशिक्षिका कु. भावना सुरेश खानोरकर यांनी सातत्याने मार्गदर्शन आणि सराव घेतल्यामुळे आस्था सातपुतेने हे यश मिळवले. गेल्या अनेक वर्षांनंतर या शाळेच्या विद्यार्थिनीची नवोदय विद्यालयासाठी निवड झाल्याने गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कु. आस्था सातपुतेने कठीण परिस्थितीवर मात करत हे यश संपादन केले आहे. लहान वयातच वडिलांचे छत्र हरपलेल्या आस्थाने आईच्या मार्गदर्शनाखाली मेहनत घेत नवोदय



विद्यालयासाठी पात्रता मिळवली आहे. शिक्षिका कु. भावना खानोरकर, तसेच मनिषा प्रमोद आसुटकर आणि गोपाल मधुकर पेंदाम यांनी परीक्षेसाठी तिला विशेष मार्गदर्शन केले.

कु. आस्था सातपुतेच्या यशाबद्दल ग्रामपंचायत सरपंच सुनिता काचिनवार, उपसरपंच शारदा कोहळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उज्वला सातपुते, उपाध्यक्ष नितेश भांडेकर, तसेच दशरथ परचाके, हिराचंद परचाके, विलास कुकुडकर, सदानंद पिपरे, दशरथ भोयर, निलीमा सातपुते, वर्षा चापडे, जिजा मेश्राम, सपना मोहुर्ले, माधुरी शेंडे, शशीकला सोयाम यांनी तिचे विशेष कौतुक केले.शाळेचे मुख्याध्यापक किशोर आनंदवार यांनीही आस्था सातपुते हिला शुभेच्छा दिल्या असून, तिच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

# विवाहितेच्या छळप्रकरणी शाहू नगर, गोडोली येथील चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**सातारा । प्रतिनिधी**

शाहू नगर, गोडोली (जगताप वाडी) येथील एका विवाहित महिलेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पतीसह चौघांविरुद्ध शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहर पोलिस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार, पती शुभम जालींदर वायदंडे, सासू अनिता जालींदर वायदंडे, सासरे जालींदर विष्णू वायदंडे आणि दिर संकेत जालींदर वायदंडे (सर्व राहणार शाहू नगर, जगताप वाडी, गोडोली, सातारा) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्याद सोनाली शुभम वायदंडे यांनी दाखल केली असून, त्यात पतीने गाडी व्यवसायासाठी माहेरहून दोन लाख रुपये आणण्याची मागणी करत वारंवार शारीरिक व मानसिक छळ केला असल्याचे नमूद केले आहे. तसेच सासरच्या मंडळींनी वेळोवेळी मानसिक आणि शारीरिक त्रास दिला, गर्भपात करायला भाग पाडले आणि पतीने दुसऱ्या महिलेसोबत प्रेमसंबंध ठेवून घटस्फोटाची मागणी केली, असे फिर्यादीत म्हटले आहे.या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास हवालदार यादव करीत आहेत.

# प्राजक्ताताई देसले महाराष्ट्र प्रदेश महिला अध्यक्षपदी

**धुळे । प्रतिनिधी**

अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती आणि ब्रीक्स मानव अधिकार मिशनच्या महाराष्ट्र महिला विभागाच्या प्रदेशाध्यक्षपदी प्राजक्ताताई देसले यांची निवड करण्यात आली आहे.पुणे जिल्ह्यात झालेल्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाबुराव क्षेत्रे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हा निर्णय घेण्यात आला. राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील बाबा संहापूरकर यांच्या आदेशानुसार आणि महिला प्रदेशाध्यक्ष राणीताई स्वामी व निवड समितीचे प्रदेशाध्यक्ष अनिल दादा देसले यांच्या संमतीने ही नियुक्ती जाहीर करण्यात आली.गेल्या वर्षभरापासून प्राजक्ताताई देसले यांनी संघटनेत सातत्याने कार्यरत राहून उल्लेखनीय योगदान दिले. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना ही जबाबदारी देण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्यांचे विविध स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# खळी येथे ग्रामस्थांचे जलसमाधी आंदोलन

**गंगाखेड | प्रतिनिधी**

श्री मारोती देवस्थान, खळी येथील गट क्रमांक ३३६ मधील ६ हे. ९४ आर जमीन बोगस कागदपत्रांच्या आधारे खाजगी व्यक्तींच्या नावावर करण्याच्या प्रयत्नांविरोधात ग्रामस्थांनी तीव्र आक्षेप घेतला असून, २६ मार्च रोजी गोदावरी नदी पात्रात जलसमाधी आंदोलन करण्यात आले.

ग्रामस्थांनी उपविभागीय अधिकारी गंगाखेड यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, १४ मार्च रोजी निर्गमित झालेल्या जाहीर प्रगटनानुसार मंदिराची विरासत परस्पर मंजूर करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. गट क्रमांक ३३६ मधील ६ हे. ९४ आर जमीन ही देवस्थान व शासनाच्या मालकीची असून, ती कोणत्याही खाजगी व्यक्तीच्या नावे जाऊ शकत नाही.ग्रामस्थांच्या आरोपानुसार, अर्जदार व त्यांचे कुटुंबीय गावात राहत नाहीत तसेच मंदिर व्यवस्थापनाशी त्यांचा कोणताही संबंध नाही. अर्जदाराचे नातेवाईक गावचे तलाठी अनिल खळीकर हे त्यांचे चुलते असल्याने बोगस कागदपत्रांच्या आधारे विरासत मंजूर करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या निर्णयाला विरोध दर्शविण्यासाठी गावकरी मोठ्या संख्येने नदी पात्रात उतरले. आंदोलनात ओंकार पवार, मावली घुलेश्वर, बंडू सावळे, संतोष सोन्नर, बालाजी सुरवसे, बंडू पांचाळ, प्रदीप गौरशेटे, आश्रोबा सावळे, उत्तम दसवंते यांच्यासह अनेक ग्रामस्थ सहभागी झाले होते.सहायक पोलीस निरीक्षक इंगळे यांच्या नेतृत्वाखाली मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. अखेर नायब तहसीलदार सुनील कांबळे यांनी ग्रामस्थांना लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी मंडळ अधिकारी यशवंत सोडगीर, तलाठी अनिल खळीकर उपस्थित होते.



# १८ गावांच्या शेतकऱ्यांचा सातबारा कोरा
## आ.रमेश पाटील बोरणारे यांच्या प्रयत्नांना यश



रामकृष्ण जलसिंचन योजना अनेक वर्षे बंद पडली होती आणि कर्जाचा बोजा शेतकऱ्यांच्या सातबारावर होता. त्यामुळे कुठल्याही प्रकारचे कर्ज मिळत नव्हते. मात्र, आमदार बोरणारे यांनी हे स्वप्न पूर्ण केले. – शैलेश सुराशे, माजी उपसरपंच



कर्जमाफीच्या निर्णयाने आमचे आयुष्य बदलले. आता सातबारा कोरा झाल्याने बँकेतून शेतीसाठी कर्ज मिळू शकते, आणि त्यामुळे प्रगतशील शेती शक्य होईल. – किरण पगार, माजी सरपंच, गोळवाडी

राजकारणात शब्दाला फार महत्त्व नसते असे म्हणणाऱ्यांना आमदार बोरणारे यांनी उत्तर दिले. त्यांनी जे वचन दिले होते ते पूर्ण केले. – बाबासाहेब शिंदे, सामाजिक कार्यकर्ता



शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाल्याने त्यांना शेतीपूरक व्यवसायासाठी – विशेषत: दुग्धव्यवसायासाठी – नव्याने कर्ज घेता येईल. – शंकर गावंडे, जय वीरभद्र दूध डेअरी चेअरमन



बोले तैसे चाले असे असणारे एकमेव आमदार म्हणजे रमेश पाटील बोरणारे! वाल्मीक पगार, प्रगतशील शेतकरी



**वैजापूर | प्रतिनिधी**

वैजापूर तालुक्यातील १८ गावांच्या शेतकऱ्यांचा सातबारा कोरा झाला आहे. रामकृष्ण जलसिंचन योजना अनेक वर्षांपूर्वी राबवण्यात आली होती, मात्र काही कारणांमुळे ती अपूर्ण राहिली. परिणामी, या योजनेचे कर्ज थेट शेतकऱ्यांच्या सातबारावर जमा झाले आणि त्यांना पीक कर्ज मिळण्यात अडथळा निर्माण झाला.

लोकप्रिय आमदार रमेश पाटील बोरणारे यांनी निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना आश्वासन दिले होते की, ते सातबारा कोरा करूनच राहतील. विरोधकांनी या आश्वासनावर टीका केली होती, तसेच निवडणुकीच्या काळात हे केवळ भूलथापा असल्याचे सांगितले होते. मात्र, आमदार बोरणारे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे अखेर ६३३.७० कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्यात आले आहे, आणि १८ गावांतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# आर्वी नाका परिसरात अवैध दारू विक्रीवर कारवाई, अतिक्रमण हटवले



**वर्धा | प्रतिनिधी**

शहरातील आर्वी नाका परिसरात बेकायदा दारू विक्रीसाठी करण्यात आलेल्या अतिक्रमणावर मोठी कारवाई करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दारू विक्री करणाऱ्या चार महिलांविरोधात कारवाई करत १ लाख १४ हजार ७०० रुपयांची देशी-विदेशी दारू जप्त केली. त्यानंतर नगर परिषद प्रशासनाने या ठिकाणचे अतिक्रमण हटवत झोपड्यांवर बुलडोजर चालवला.

जिल्ह्यात दारूबंदी असतानाही मोठ्या प्रमाणात अवैध दारूची वाहतूक व विक्री सुरू असल्याचे समोर येत आहे. बुधवारी (२६ मार्च) संध्याकाळी आर्वी नाका परिसरात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धाड टाकून चार महिलांकडून मोठ्या प्रमाणात दारू जप्त केली. या महिलांनी अतिक्रमण करून राहत्या घरांसोबतच शेड, पानटपऱ्या आणि टिन पत्र्यांच्या आडून दारू विक्री सुरू केली होती.

घटनेची माहिती मिळताच मुख्याधिकारी राजेश भगत यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषद प्रशासनाने अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबवली. या कारवाईत सुमारे २० ते २५ घरांसमोरील व बाजूचे अतिक्रमण हटवण्यात आले. पोलिस अधीक्षक अनुराग जैन, अप्पर पोलिस अधीक्षक सागर कवडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विनोद चौधरी, उपनिरीक्षक अमोल लंगड, पीएसआय प्रकाश लसुंटे, प्रकाश नागापुरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही कारवाई केली.

# एस.एस.एम.विद्यालयात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ लोक कल्याण समिती व स्व.आप्पाजी जोशी स्मृती सेवा न्यास द्वारा रक्त तपासणी शिबीराचे आयोजन



**हिंगणघाट | प्रतिनिधी**

प्रोग्रेसिव एजुकेशन सोसायटी, हिंगणघाट द्वारा संचालित एस. एस. एम. विद्यालयात दिनांक २४ मार्च २०२५ रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ लोक कल्याण समिती व स्व. आप्पाजी जोशी स्मृती सेवा न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने रक्त तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव र.गं.धारकर होते. व्यासपीठावर जिल्हा संघचालक जेठानंद राजपूत, सेवा न्यासाचे समीर धारकर, शाळेचे मुख्याध्यापक र.ता. कारवटकर, उपमुख्याध्यापिका मद्दलवार, पर्यवेक्षक ई.शं. चंदनखेडे, नागपूर येथील रोहित वाढई, कु. गौरी बिसेन, कु. पूनम बोरकर उपस्थित होते.

माता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. प्रास्ताविक मेघरे यांनी करत लोक कल्याण समिती व स्व. आप्पाजी जोशी स्मृती सेवा न्यास यांच्या कार्याची माहिती दिली. तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना आहार व हिमोग्लोबिनचे महत्त्व सांगितले.या शिबिरात शाळेतील ७०० विद्यार्थ्यांची सीबीसी, हिमोग्लोबिन आणि सिकलसेल तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष धारकर यांनी आप्पाजी जोशी यांच्या कार्याविषयी माहिती देत रक्त तपासणीचे महत्त्व विशद केले. मुख्याध्यापक कारवटकर यांनी रक्त तपासणी शिबीर आयोजित केल्याबद्दल लोक कल्याण समिती आणि स्व. आप्पाजी जोशी स्मृती सेवा न्यास यांचे आभार मानले.कार्यक्रमाचे संचालन तेलंग यांनी केले. शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# स्व.सुंदरबाई नरुटे यांच्या स्मरणार्थ संगोबा येथे दशक्रिया विधीस मोफत पाणी टाकी व पाण्याची सुविधा





**सोलापूर | प्रतिनिधी**

आदर्श माता स्व. सौ. सुंदरबाई मुरलीधर नरुटे यांच्या स्मरणार्थ नरुटे परिवाराने संगोबा येथे दशक्रिया विधीसाठी कायमस्वरूपी पाणी टाकी आणि पाणीपुरवठ्याची व्यवस्था केली आहे.तीर्थक्षेत्र श्री अदिनाथ महाराज मंदिर, संगोबा येथे नदीपात्रालगत नरुटे परिवाराच्या शेताजवळ दररोज दशक्रिया विधी होतात. मात्र, सध्या उन्हाळ्यामुळे नदीपात्र कोरडे पडले असून, उरलेले पाणी दूषित झाले आहे. यामुळे विधीसाठी आलेल्या कुटुंबीयांना घरून किंवा वाहनाद्वारे पाणी आणावे लागत होते. ही समस्या लक्षात घेऊन ड. प्रा. शशिकांत नरुटे आणि त्यांच्या परिवाराने पाणी टाकी व पाणीपुरवठ्याची सोय करण्याचा निर्णय घेतला.

सोमवारी सायंकाळी रामकृष्ण हरी वारकरी बीज मंत्र जप आणि अन्नछत्र मंडळाच्या महाप्रसाद कार्यक्रमादरम्यान या पाणी टाकीचे पूजन प्रविण गायकवाड आणि काकासाहेब गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. या लोकार्पण सोहळ्यास नरुटे परिवारातील पंडित नरुटे, ज्ञानदेव नरुटे, ड. प्रा. शशिकांत नरुटे, प्रा. श्रीकांत दरगुडे, धनाजी नरुटे, विनेश नरुटे, बाळू नरुटे, कालिदास नरुटे, तुकाराम नरुटे, दिलीप काळे, दादासाहेब नरुटे, आण्णासाहेब सुपनवर यांच्यासह परिसरातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आण्णा सुपनवर यांनी केले, तर आभार प्रा. नरुटे सर यांनी मानले.

**“ उन्हाळ्यात सीना नदी कोरडी पडल्याने दशक्रिया विधीसाठी आलेल्या कुटुंबीयांना पाण्यासाठी हालअपेष्टा सहन कराव्या लागत होत्या. ही समस्या लक्षात घेऊन नरुटे परिवाराने पाणी टाकी आणि पाण्याची सुविधा उपलब्ध करून दिली.**

### आदर्श मातृत्वाचा वारसा . जपणारा उपक्रम-नरुटे

माझी आई आदर्श माता होती. तिने अनेकांचे दुःख वाटून घेतले, तहानलेल्यांना पाणी दिले. तिच्या स्मरणार्थ आम्ही ही सुविधा उपलब्ध केली आहे. आमच्या आजोबा कै. विठोबा नरुटे आणि आजी कै. हौसाबाई नरुटे यांचा वारसा आम्हाला लाभलेला आहे.

– ॲड. प्रा. शशिकांत नरुटे

# उपक्रमशील शिक्षक दत्तात्रय रासकर यांना आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार प्रदान




**पारनेर | प्रतिनिधी**

वाघुंडे बु. गावचे सुपुत्र आणि उपक्रमशील शिक्षक दत्तात्रय अर्जुन रासकर यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेचा २०२३-२४ चा सर्वोच्च मानाचा ‘आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार’ प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. अमित सैनी, उपायुक्त (शिक्षण) डॉ. प्राची जांभेकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ, माध्यमिक शिक्षणाधिकारी सुजाता खरे आणि प्रशासकीय अधिकारी किसन पावडे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. दत्तात्रय रासकर यांना सन्मानचिन्ह, पदक, प्रमाणपत्र, शाल, पुष्पगुच्छ आणि ११,००० रुपये रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास महानगरपालिकेचे सर्व उपशिक्षणाधिकारी, प्रशासकीय अधिकारी, विभाग निरीक्षक आणि मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.उच्च विद्या विभूषित असलेल्या दत्तात्रय रासकर यांनी शाळेमध्ये नवनवीन उपक्रम राबवत विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सातत्याने सुधारणा केली आहे. त्यांच्या उत्कृष्ट शैक्षणिक आणि सामाजिक कार्यामुळे त्यांना हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला.नवी मुंबई आणि पारनेर परिसरातील शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांच्या या यशाबद्दल अभिनंदन केले आहे.



# छोटू भाई यांच्या निवेदनाची दखल
## २८७ दिव्यांगांना गुढीपाडवा व ईदपूर्वी १४.३५ लाखांचा लाभ

**वरोरा | प्रतिनिधी**

वरोरा शहर व तालुक्यातील २८७ दिव्यांग व्यक्तींना शासनाच्या नियमानुसार ५% निधी मंजूर करण्यात आला असून, गुढीपाडवा व ईदपूर्वी प्रत्येकी ५,००० रुपये त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले.


नगरपालिकेच्या नियमानुसार हा निधी मार्चच्या सुरुवातीला वितरित होणे आवश्यक होते. मात्र, प्रशासनाच्या विलंबामुळे लाभार्थ्यांना निधी मिळालेला नव्हता. यामुळे माजी सभापती व सामाजिक कार्यकर्ते शेख जैरुद्दीन उर्फ छोटू भाई यांनी नगरपरिषदेला लेखी निवेदन दिले होते.यानंतर, मुख्याधिकारी विशाखा शेळके यांच्या उपस्थितीत दिव्यांग बांधव व भगिनींसोबत बैठक घेण्यात आली. या चर्चेनंतर निधी तत्काळ मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि २१ मार्चपर्यंत सर्व लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्यात आली.निधी मिळाल्यानंतर लाभार्थ्यांनी मुख्याधिकारी विशाखा शेळके व छोटू भाई शेख यांचा सत्कार करून त्यांचे आभार मानले.छोटू भाई यांनी सामाजिक कार्यकर्ते व जयहिंद सैनिक संस्थेचे राजेंद्र मर्दाने, बाळासाहेब जिवने, अशोक बावणे, यादव घ्यार, वरिष्ठ लिपिक घनश्याम तिवारी यांचे विशेष आभार मानले.यासोबतच तालुक्यातील ग्रामपंचायतींमधील दिव्यांग व्यक्तींना अर्थसहाय्य मिळावे यासाठी पंचायत समिती वरोरा यांना निवेदन पाठवण्यात आले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा लाभ दिव्यांग बांधवांना मिळावा यासाठी प्रयत्न सुरूच राहतील, असे छोटू भाई यांनी स्पष्ट केले.

# गोदाकाठच्या गावात अवैध माती उत्खनन सुरूच
## प्रशासन दुर्लक्ष करतेय?

**गंगाखेड | प्रतिनिधी**

परभणी जिल्ह्यातील गोदावरी पात्रातून गंगाखेड, सोनपेठ, पालम, पूर्णा भागात मोठ्या प्रमाणावर अवैध माती उत्खनन सुरू असून, स्थानिक प्रशासन डोळेझाक करत असल्याचा आरोप नागरिक व सामाजिक कार्यकर्ते करत आहेत.

उन्हाळ्याच्या दिवसांत जलस्रोत कमी होत असताना, गोदावरीच्या काठची मातीही उत्खनन होत असल्याने पर्यावरणीय समतोल बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. वाळू माफियांकडून बेकायदेशीरपणे माती उपसली जात असून, यामुळे परिसरातील रस्ते खराब झाले आहेत. अवजड वाहतुकीमुळे उडणाऱ्या धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होत आहे.स्थानिक ग्रामपंचायती आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी वारंवार या अवैध उत्खननाविरोधात आवाज उठवला, वृत्तपत्रांतून बातम्या प्रसिद्ध झाल्या, तरीही गंगाखेड तहसील कार्यालय व पोलीस प्रशासन कारवाई करण्यास असमर्थ असल्याचे चित्र आहे. याला शासनाचे अभय आहे की प्रशासनाचे, असा प्रश्न स्थानिक नागरिक विचारत आहेत. प्रशासनाने तत्काळ कारवाई करून हे अवैध उत्खनन थांबवावे, अशी मागणी होत आहे.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .